# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

**बैठक क्रमांक** : 178

**स्थळ** : Online Meeting App/OFFLINE

**वार व दिनांक** : शनिवार दि. 07 ऑगस्ट 2021

**वेळ** : दुपारी 03.00 वाजता

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## (महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.178 (Online ),शनिवार दि. 07 ऑगस्ट 2021 दुपारी 03.00 वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू | अध्यक्ष |
| 2. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंगांरामुवि, नवी दिल्ली | सदस्य |
| 3. प्रा. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | सदस्य |
| 4. मा.श्री. विलास शिंदे, नाशिक | सदस्य |
| 5. मा.आ. डॉ. सुधीर तांबे, संगमनेर | सदस्य |
| 6. श्री. डी.पी. नाठे,संचालक, तंत्रशिक्षण,मंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 7. डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 8. मा.डॉ.दिनेश भोंडे, कुलसचिव | सचिव |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | |
|---|---|
| 1.मा.प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली | सदस्य |
| 2.मा. आ.श्री. सुहास कांदे,नाशिक | सदस्य |
| 3.मा.आ.श्रीमती सरोज आहिरे,नाशिक | सदस्य |
| 4. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 5. मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 6. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 7. मा, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |

| क्र. | ठराव क्र, | तपशील |
|---|---|---|
| 178.1.0 | 178.1.1 | **स्वागत** –<br>बैठकीच्या सुरूवातीला कुलसचिवांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. मा. कुलपती यांनी प्रा. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांची विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती केल्याबद्दल मा. कुलगुरू यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच मा. कुलपती नियुक्त डॉ. आशिष पातुरकर, डॉ. अनिल कुलकर्णी, डॉ. सचिन मांडवगणे आणि श्री. हेमंत अंबासेलकर यांचा व्यवस्थापन मंडळ सदस्य कालावधी संपुष्टात आल्याने त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. |
| 178.2.0 | 178.2.1 | दि. 25 मे 2021 रोजी झालेल्या 177 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे (Online App) कार्यवृत्त वाचून कायम करणे<br>To read and continue the minutes of the 177th meeting of the Board of Management(Online App) held on 25 May 2021<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 25 मे 2021 रोजी झालेल्या 177 व्या व्यवस्थापन व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा (Online) कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. |
|  | 178.2.2 | दि. 25 मे 2021 रोजी झालेल्या 177 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील (Online |

| | | |
|---|---|---|
| | | App)झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>Report of the Proceedings of the 177$^{th}$meeting of the Board of Management(Online App) held on 25 May 2021<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 25 मे 2021 रोजी झालेल्या 177 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा (Online) कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. |
| 178.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय (In-Depth Discussion Items)** |
| | 178.3.1 | **विद्यापीठाची उपकेंद्र व केंद्र उघडण्याबाबत, तसेच रत्नागिरी, ठाणे, बारामती या ठिकाणी शासनाकडून निशुल्क जागा मिळत असल्याबाबत अभिनंदन ठराव**<br>Opening of YCMOU Centre and Sub-centre,<br>Vote of Thanks of Govt. of Maharashtra for giving the Land on free of cost at Ratnagiri, Thane and Baramati<br><br>सदरील विषयसंदर्भात खालील माहिती बैठकीत सादर करण्यात आली.<br>सध्या विद्यापीठाची आठ विभागीय केंद्र असून या आठ विभागीय केंद्रामार्फत साधारणत: 1600 अभ्यासकेंद्रांवर नियंत्रण ठेवले जाते. आज विद्यापीठाची विद्यार्थी संख्या 06 लाख इतकी झालेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुविधा देण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे साधारणत: दोन जिल्ह्याकरीता एक उपकेंद्र प्रस्तावित आहे. व ते उपकेंद्र विभागीय केंद्राच्या अधिपत्याखाली कार्यरत राहील. उपकेंद्राची रचना खालीलप्रमाणे आहे.<br>उपकेंद्रांचे बांधकाम साधारणत : 300 ते 400 स्केअर मीटरचे असेल. उपकेंद्रात 01 समन्वयक, 02 प्रशासकीय सहायक, 01 शिपाई असे मनुष्यबळ करारपध्दतीने उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.<br>याशिवाय महत्वाच्या शहरात विद्यापीठाची केंद्र (Centre) उघडल्यास तेथे विद्यापीठाचे विविध उपक्रम, प्रशिक्षण, कार्यशाळा, अभ्यासिका, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करता येतील. विद्यापीठाला शासनाकडून विविध ठिकाणी जागा उपलब्ध होत आहेत.<br>राज्याच्या मोठ्या शहरात विद्यापीठाचे केंद्र (Center) उघडून तेथे विविध उपक्रम, कार्यशाळा, स्पर्धा परीक्षा केंद्र, अभ्यासिका, इ. उपक्रम राबविता येतील.<br>वरील अनुषंगाने राज्याच्या विविध भागात शासनाकडून निशुल्क भुखंड उपलब्ध होत आहेत.<br>मुंबई येथे शासकीय तंत्रनिकेतनच्या जागेवर शासनातर्फे बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित इमारतीत 10 हजार स्केअर फुट जागा विद्यापीठास देण्याचे प्रस्तावित आहे.<br>रत्नागिरी येथे मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचेसोबत दि. 15.2.2021 रोजी झालेल्या बैठकीत रत्नागिरी शहरात विद्यापीठाचे उपकेंद्र तसेच छत्रपती शिवाजी महाराज अंतराष्ट्रीय ग्रंथालय व संशोधन केंद्र सूरू करण्यासाठी भुखंड उपलब्ध करून देण्यात आला आहे.<br>मा. उपमुख्यमंत्री यांचेसोबत दि. 24 मार्च 2021 रोजी झालेल्या बैठकीत बारामती येथे विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याबाबत चर्चा झाली असतांना उपकेंद्रासोबत ग्रंथालयही सूरू करावे, असे बैठकीत सूचित केले असून त्यानुसार शासनाकडून भुखंड उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सूरू आहे. सदर बांधकामाकरीता शासनाकडून निधिसुध्दा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.<br>ठाणे येथे हिरानंदानी मिडोज् जवळील निहारीका सोसायटी येथे नगरविकास विभागाच्या दि. 01 डिसे. 2020 च्या शासन निर्णयानुसार 1550.21 स्केअर मीटर जागा निशुल्क उपलब्ध होत आहे. या जागेवर विद्यापीठाचे केंद्र उभारून तेथे विविध उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे.<br>जालना येथे व बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे उपकेंद्र सूरू करण्याबाबत संबंधित संस्थेमार्फत विद्यापीठास प्रस्ताव सादर केलेला आहे, असे मा. कुलगुरू यांनी बैठकीत अवगत केले.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** –<br>1. वरील उपक्रमास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच वरील ठिकाणी बांधकामाची प्रक्रिया सुरू करावी अशी सूचना व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. सत्यकामा यांनी केली. |

| | | |
|---|---|---|
| | | 2. महाराष्ट्र शासन, मा. उपमुख्यमंत्री, श्री. अजितदादा पवार, मा. नगरविकास मंत्री श्री. एकनाथजी शिंदे व मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. उदयजी सामंत यांनी विद्यापीठास निशुल्क जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी अभिनंदन करून व त्यांचे आभार व्यक्त केले. |
| | 178.3.2 | **दि.** 24.2.2021 **रोजी झालेल्या वित्त समितीतील उर्वरित विषयांचे कार्यवृत्त मंजुरी साठी सादर** सहपत्र C<br>Submitted for approval-the remaining items of the meeting of Finance Committee held on 24.2.2021 Annexure C<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव –**<br>दि. 24.2.2021 रोजी वित्त समितीची बैठक ऑनलाईनद्वारे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे कार्यवृत्त दि. 01 मार्च 2021 रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळ बैठकीत मंजूरीसाठी सादर करण्यात आले होते. वित्त समितीचे विषय क्र. 16.3.1, 16.3.2, 16.3.3, 16.3.6, 16.3.7 आणि 16.3.9 या विषयांना 01 मार्च 2021 च्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार मान्यता देण्यात आली होती. परंतु दि. 24.2.2021 च्या वित्त समितीच्या बैठकीतील इतिवृत्तातील उर्वरित विषय क्र. 16.3.5, 16.3.8, 16.4.1, 16.4.4 या विषयांना वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदर बैठकीत सखोल चर्चा करून मान्यता देण्यात आली. |
| | 178.3.3 | **दि.18.3.2021 रोजी झालेल्या वित्त समितीचे कार्यवृत्त मंजुरीसाठी सादर**<br>Submitted for approval -The minutes of the meeting of Finance Committee held on 18.03.2021<br>विषय क्र. 17.2.1<br>सन 2010-11 ते 2013-14 या आर्थिक वर्षाच्या आयकराचे अपील आणि विवाद से विश्वास या योजनांपैकी योग्य तो पर्याय निश्चित करण्याबाबत.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव-**<br>सन 2010-11 ते 2013-14 या आर्थिक वर्षाच्या आयकराच्या अपील आणि विवाद से विश्वास योजनापैकी योग्य तो पर्याय निश्चित करण्याबाबत वित्त समितीची दि. 18 मार्च 2021 रोजी ऑनलाईनद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस वित्त समितीचे सदस्य तसेच आयकर सल्लागार सी.ए. श्री. प्रकाश पाठक व श्री. करण महाले, व विद्यापीठाचे लेखापरीक्षक यांनी सूचविल्यानुसार व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सखोल चर्चा केल्यानंतर विवाद से विश्वास या योजनेचा सहभाग नोंदवून विहित प्रक्रिया पूर्ण करून होणारा लाभ प्राप्त करण्यासाठी विद्यापीठास भरावी लागणारी रक्कम रु. 35.59 कोटी आयकर खात्याकडे जमा करण्यास मान्यता देण्यात आली |
| | 178.3.4 | दि. 9 जुन 2021 रोजीच्या गट अ मधील उपकुलसचिव पदावरील पदोन्नती समितीची शिफारस मान्यतेसाठी<br>Submitted for approval-The recommendation of the Promotion Committee for the post of Deputy Secretary in Group A dated 9th June, 2021<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -**<br>खाते अंतर्गत पदोन्नती समितीने श्री. हिरालाल माळवे, सहायक कुलसचिव यांना गट-अ मधील उपकुलसचिव पदावर केलेल्या पदोन्नतीच्या शिफारशीस मान्यता देण्यात आली. |
| | 178.3.5 | तेजस्विनी पवार – अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबत संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कडून आलेल्या पत्राबाबत निर्णय घेणेची बाब<br>Tejaswini Pawar – Regarding taking decision on the letter received from Director, Higher Education, Pune, regarding appointment on Compassionate basis<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव –**<br>श्रीमती तेजस्वीनी पवार, यांना अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी केलेल्या अर्जाबाबत सविस्तर टिपण करून सदर प्रकरण संचालनालय, उच्च शिक्षण यांच्याकडे पाठवावे असे दि. 01मार्च 2021 |

| | | |
|---|---|---|
| | | च्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ठरले होते. त्यानुसार शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांच्या दि. 28 मे 2021 च्या पत्रान्वये ' श्रीमती तेजस्वीनी पवार यांच्या अनुकंपा तत्वारील नियुक्तीस संचालनालयाची हरकत नाही असे पत्र प्राप्त झाले आहे. ' त्यानुसार श्रीमती तेजस्वीनी पवार यांना गट-ड मधील शिपाई या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 178.3.6 | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संगणक केंद्रातील तांत्रिक पदाना पदोन्नती देण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल व शिफारशी मान्यतेसाठी सादर<br>Submitted for approval- Report and recommendations of the Committee established for the promotion of technical posts in the Computer Center of Yashwantrao Chavan Maharashtra Open University<br><br>संगणक केंद्रातील तांत्रिक पदाना पदोन्नती देण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल मा. कुलसचिव यांनी सदर बैठकीत सादर केला. बैठकीत यावर चर्चा झाली.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** -<br>सदर अहवाल तपासून अभिप्राय घेण्यासाठी श्री. ज्ञानदेव नाठे, सहसंचालक, तंत्रशिक्षण व डॉ. सत्यकामा, प्र. कुलगुरू IGNOU यांची समिती गठित करावी असे ठरले. |
| | 178.3.7 | विद्यापीठातील प्राध्यापक पदे भरण्याबाबत<br>Regarding recruitment for the post of Professor<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** -<br>खालील चार विद्याशाखेतील प्राध्यापक पदाची रिक्त असलेली प्रत्येकी 01 पद विहित निवडप्रक्रियेतून भरण्यास मान्यता देण्यात आली.<br>1) मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा, 2) वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, 3) संगणकशास्त्र विद्याशाखा 4) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा |
| | 178.3.8 | विद्यापीठातील शिक्षकांना सातव्या आयोगानुसार थकबाकीबाबत..<br><br>दि. 08.03.2019 च्या शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठातील शिक्षकांना दि. 1.1.2016 पासून सातवा वेतन लागू करून वेतन आयोगानुसार 01 एप्रिल 2019 पासून रोखीने वेतन देण्यात आलेले आहे.<br>अनुदानित विद्यापीठातील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाची दि. 1.1.2016 ते 31.03.2019 पर्यंतची थकबाकीची रक्कम ही केंद्र सरकार व राज्य सरकार 50-50% अदा करते. केंद्र शासनाकडून थकबाकीची अदा करावयाची रक्कम शासनास प्राप्त झाल्याने ती वितरित करण्यातबाबत शासनाने दि. 20.05.2021 रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यात नमुद केल्यानुसार केंद्र शासनाकडून प्राप्त थकबाकीची रक्कम एका हप्त्यात भविष्य निर्वान निधीत जमा करावी व राज्य शासनाची देय रक्कम 2020-21 या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षात पाच समान हप्त्यात जमा करण्याचे निर्देशित केले आहे.<br>राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना दि. 30.1.2019 च्या अधिसूचनेनुसार 01.01.2016 पासून सातवा वेतन लागू करून त्यानुसार 01.01.2019 पासून प्रत्यक्ष वेतन देण्यात आले. 01.01.2016 ते 31.12.2018 पर्यंतची थकबाकी पुढील पाच वर्षात समान पाच हप्त्यात भविष्य निर्वाह निधीत जमा करण्याचे निर्देशित आहे.<br>दि. 28.12.2020 च्या शासन निर्णयानुसार या विद्यापीठाच्या 01.01.2016 पासून सातवा वेतन लागू करून प्रत्यक्ष वेतन 01 नोव्हे. 2020 पासून अदा करण्याचे निर्देशित आहे. तसेच त्यात 01.01.2016 ते 31.10.2020 पर्यंतची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही असे नमुद आहे.<br>शिक्षकांना थकबाकी अदा करण्याच्या विषयावर चर्चा करीत असतांना विद्यापीठास वेतन अनुदान मिळत नसल्याने केंद्र सरकार व राज्य सरकार कडील रक्कम विद्यापीठास प्राप्त होत नाही. आणि |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाला विद्यापीठाच्या निधितूनच थकबाकीची रक्कम अदा करण्यात येते. यापूर्वी पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी देतांना व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन थकबाकी कर्मचाऱ्यांना अदा केलेली आहे.<br>याबाबत चर्चा करीत असतांना शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुध्दा थकबाकी मिळायला हवी अशी सूचना मा. व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी केली. एकाच विद्यापीठातील शिक्षकांना व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना थकबाकी देण्याबाबत वेगवेगळे नियम लावणे योग्य होणार नाही. तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची थकबाकी देण्यास विद्यापीठ आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे, सन 2021-22 च्या अंदाजपत्रकात थकबाकीसाठी तरतुद केलेली आहे. त्यामुळे शिक्षकांप्रमाणेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनासुध्दा थकबाकी देण्यात यावी याबाबत सहमती झाली. .<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** -<br>सदरील विषयाबाबत वरीलप्रमाणे सखोल चर्चा करण्यात आली. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी शिक्षकांप्रमाणेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही 80% रोखीने देण्यात आली होती व 20% टक्के भविष्य निर्वाह निधीत जमा करण्यात आली होती. त्यानुसार सातव्या वेतन आयोगाची थकबाकी सुध्दा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना 80% रोखीने अदा करण्यात यावी व 20% टक्के भविष्य निर्वाह निधित जमा करण्यात यावी, तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी व टेन्यअर पदावरील अधिकाऱ्यांना थकबाकी रोखीने अदा करण्यात यावी, यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | **178.3.9** | तदर्थ Adoc Pramotion —बाबत<br>Regarding Adoc Pramotion<br>सेवानिवृत्ती तसेच विविध कारणांमुळे सरळसेवेची पदे भरण्यास मर्यादा आलेल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठात सरळसेवेची उपकुलसचिव व इतर पदे अनेक वर्षापासून रिक्त आहेत.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** -<br>सरळसेवेच्या रिक्त पदांवर पात्र उमेदवारांना तदर्थ पदोन्नती देतांना महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासननिर्णयानुसार तदर्थ पदोन्नती करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 178.4.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** - Post Facto Approval |
| | 178.4.1 | व्यवस्थापन मंडळाच्या आधिकारात मा.कुलगुरूंनी मान्यता दिलेल्या विद्यापीठाच्या विविध विभाग/ केंद्र/कक्ष व विद्याशाखा येथे करारावरील सहयोगी सल्लागार ( प्रशासकीय) , संयोजक(शैक्षणिक) व सहायक संयोजक (प्रशासकीय) यांच्या नियुक्तीबाबतचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर<br>Presented before the Board of Management the item of the appointment of Associate Adviser (Administrative), Coordinator (Academic) and Assistant Coordinator (Administrative) on contract in various Departments / Centers / Units and Schools of the University approved by the Vice-Chancellor under the authority of the Board of Management.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – विद्यापीठ कायदा,परिनियम, नियम , मा.कुलगुरु यांना कायद्यानुसार देण्यात आलेले अधिकार, तसेच व्यवस्थापन मंडळाचे अधिकार या आधारे विद्यापीठाने वेळोवेळी करार तत्वावर केलेल्या नेमणुका याबाबत मा.कुलगुरु यांनी दिलेली कार्योत्तर मान्यता याची नोंद घेऊन विविध विभागीय केंद्रावर करारावरील वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विविध विद्याशाखांमधील करारावरील संयोजक (शैक्षणिक) व संयोजक (प्रशासकीय ) व इतर करारावरील केलेल्या नेमणुका यांच्या पुर्ननियुक्तीस सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 178.4.2 | Odisha State Open University, Sambalpur (Odisha) व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यात झालेल्या कराराबाबत (Sharing Resources, Teaching Learning Activities)<br>Regarding the Agreement between Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik and Odisha State Open University, Sambalpur (Odisha) (Sharing |

| | | |
|---|---|---|
| | | Resources, Teaching Learning Activities)<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -**<br>Odisha State Open University, Sambalpur (Odisha) व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यात झालेल्या करारास (MOU) नोंद घेऊन मान्यता देण्यात आली. |
| 178.5.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय**<br>On the spot items with the permission of the Chair |
| | 178.5.1 | **विद्यापीठात नोव्हे. 2005 नंतर नियमित वेतनश्रेणीत नियुक्त झालेल्या शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय पेन्शन योजना (NPS) लागू करण्याबाबत**<br>विद्यापीठात नोव्हे. 2005 नंतर नियमित वेतनश्रेणीत नियुक्त झालेल्या शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 174.3.2 दि. 31 ऑक्टो. 2020 च्या ठरावान्वये HDFC Pension Co. Ltd. यांना मान्यता देण्यात आली होती, परंतु त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय एनपीएस-2019/प्र.क्र. 366/19/विशि-1 दि. 17 मार्च 2021 अन्वये सर्व अकृषी विद्यापीठास राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना स्तर-1 लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार सदरील शासननिर्णयानुसार विद्यापीठाने HDFC Co. ऐवजी NSDL कंपनीमार्फत राष्ट्रीय निवृत्ती योजना स्तर-1 सूरू करण्यात आली आहे.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -**<br>दि. 17 मार्च 2021 च्या शासन निर्णयानुसार विद्यापीठातील नोव्हे. 2005 नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचाऱ्यांना HDFC Co. ऐवजी NSDL कंपनीमार्फत राष्ट्रीय निवृत्ती योजना स्तर-1 सुरू करण्यास मा. कुलगुरू यांनी मान्यता दिलेली होती. या कार्यवाहीची नोंद घेऊन मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 178.5.2 | **विद्यापीठातील निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून 12 व 24 वर्षे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाच्या फरकाच्या रक्कमेबाबत**<br>शासनाने दि. 01 एप्रिल 2010 च्या शासननिर्णयानुसार दोन लाभाची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. 15.2.2011 च्या शासननिर्णयानुसार जसेच्या तसे लागू केले होते. परंतु या 15.2.2011 च्या शासन निर्णयास वित्त विभागाची मान्यता नसल्याने ते दि. 07 डिसे. 2018 च्या शासन निर्णयानुसार सदर योजना पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना दि. 1.1.2006 पासून या योजनेंतर्गत लाभ मिळाले असल्यास ते मागे घेऊन वेतननिश्चिती करण्यात येत होती. लाभ मागे घेतल्यामुळे येणाऱ्या फरकाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांकडून वसुल करण्यात येत होती.<br>सदर दि. 7 डिसे. 2018 चा शासन निर्णय अन्यायकारक असून त्यानुसार वसुली करणे योग्य नाही असे मा. उच्च न्यायालयाचे म्हणणे असल्याचे वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे, त्यामुळे सदर 07 डिसे. 2018 चा शासननिर्णय रद्द होऊन दोन लाभाची योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावी लागेल, त्यामुळे फरकाची वसुल केलेली रक्कम परत द्यावी लागणार आहेच, विद्यापीठास शासनाकडून कोणतेही वेतन अनुदान मिळत नसून या योजनेच्या लाभाची रक्कम विद्यापीठ निधीतूनच दिली जाते. त्यामुळे आता सद्यस्थितीत सदर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण शासनाकडे सादर करतांना या योजनेचे लाभ मागे घेऊन वेतननिश्चिती करावी, परंतु फरकाची रक्कम वसूल करू नये अशी कर्मचाऱ्यांनी मा. कुलगुरू यांच्याकडे मागणी केली असल्याने मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत योग्य त्या कार्यवाहीस्तव प्रस्तावित करण्यात आले.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -**<br>या विषयावर सखोल चर्चा होऊन सदर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण शासनाकडे |

| | | |
|---|---|---|
| | | सादर करतांना या योजनेचे लाभ मागे घेऊन वेतननिश्चिती करावी, यामुळे येणाऱ्या फरकाची रक्कम मात्र वसूल करू नये, याकरीता संबंधित कर्मचाऱ्याकडून हमीपत्र घेण्यात यावे. यास मान्यता देण्यात आली. |

सभेच्या शेवटी सर्व सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु तथा अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**